राज्याची ऊर्जानिर्मिती क्षमता ५५ हजार मेगावॅट

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : स्वातंत्र्यप्राप्तीपासून आजवर महाराष्ट्राची वीज निर्मिती क्षमता ४० हजार मेगावॅटपर्यंत होती. परंतु, गेल्या अडीच वर्षांत २० हजार मेगावॅटचे सौर ऊर्जा प्रकल्प मंजूर केल्याने महाराष्ट्राची ऊर्जा निर्मिती क्षमता आता ५५ हजार मेगावॅट झाली आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

फडणवीस यांनी नागपुरातील बुटीबोरी एमआयडीसी परिसरात अवाडा इलेक्ट्रो प्रायव्हेट लिमिटेडच्या सोलर पॅनल, सोलर सेल आणि अपारंपरिक ऊर्जा उपकरण निर्मिती प्रकल्पाचे भूमिपूजन सोमवारी केले. याप्रसंगी ते बोलत होते.

फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रात ऊर्जा क्षेत्रात मोठे परिवर्तन होत आहे. शेतकऱ्यांसाठी विशेष ऊर्जा कंपनी स्थापन करण्यात आली. १२ हजार मेगावॅट क्षमतेच्या सोलर पार्कचे काम सुरू केले. यामध्ये अवाडा कंपनी १३०० मेगावॅट सौर ऊर्जा निर्मिती करणार आहे. हे केवळ नऊ महिन्यात झाले आहे. अजून ४ हजार मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पाचे काम करण्यात येणार आहे.

पाच हजार लोकांना रोजगार

बुटीबोरी येथे अवाडा समूह १४ हजार कोटींची गुंतवणूक करणार आहे. येत्या एप्रिलपर्यंत उत्पादन सुरु होईल. यातून ५ हजार लोकांना थेट रोजगार मिळणार आहे आणि या प्रकल्पात ५१ टक्के सहभाग महिला कर्मचाऱ्यांचा राहणार आहे, असेही फडणवीस म्हणाले.

वीज आधी प्रतियुनिट ८ रुपयाला मिळत होती व शेतकऱ्यांना १.२५ रुपयांना दिली जात होती. उर्वरित रकमेसाठी सरकारच्या तिजोरीवर किंवा उद्योजकांवर भार टाकला जात होता.

आता वीज सरासरी ३ रुपयाला मिळत आहे. म्हणजे ५ रुपयांची बचत आहे. शेतकऱ्यांना दिवसादेखील वीज मिळू लागली आहे. २०३० पर्यंत महाराष्ट्र ५० टक्के अपारंपरिक ऊर्जा वापरणारे पहिले राज्य ठरू शकेल, असा विश्वासही फडणवीस यांनी व्यक्त केला.

वन्यजीवांवर आधारित टपाल तिकीट

भारतीय वन्यजीव संस्थेचा पुढाकार

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : वन्यजीव संरक्षण, संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी आणि अधिकाधिक लोकांना या कामात सामावून घेण्यासाठी देहरादून येथील भारतीय वन्यजीव संस्थेने 'वन्यजीव वारसा' दर्शवणारे टपाल तिकीट प्रकाशित केले आहे. पाच रुपयांच्या या टपाल तिकिटावर भारताचा राष्ट्रीय पक्षी, वृक्ष, फूल, सस्तन प्राण्यांची छायाचित्रे आहेत. भारतीय वन्यजीव संस्थेने ७०व्या राष्ट्रीय वन्यजीव सप्ताहादरम्यान शनिवारी डेहराडून येथे भारताचा वन्यजीव वारसा दर्शवणाऱ्या टपाल तिकिटाचे प्रकाशन करून ३५व्या वार्षिक संशोधन परिसंवादाचे उद्घाटन केले. याच कार्यक्रमात राष्ट्रीय वन्यजीव सप्ताहानिमित्त विशेष टपाल तिकिटाचे प्रकाशन करण्यात आले.

या टपाल तिकिटावर भारताचा राष्ट्रीय पक्षी मोर, राष्ट्रीय वृक्ष वड, राष्ट्रीय फूल कमळ आणि राष्ट्रीय प्राणी वाघ चिन्हांकित आहेत. या तिकिटाच्या माध्यमातून भारताचा वन्यजीव वारसा मांडला आहे. राष्ट्रीय वन्यजीव सप्ताहासाठी विशेष 'पोस्टल कव्हर' प्रकाशित केले असून भारतातील नद्यांची समृद्धी दर्शवणारा नकाशा देखील यावेळी प्रकाशित करण्यात आला. याप्रसंगी आयोजित परिसंवादात पर्यावरणीय अभ्यास, संवर्धन, मोठ्या सस्तन प्राण्यांवर दीर्घकालीन संशोधन आणि वन्यजीव संवर्धनाच्या पुनःपरिचयाच्या महत्त्वपूर्ण बाबींवर वन्यजीव तज्ज्ञांच्या अध्यक्षतेखालील विविध सत्रांचा समावेश होता. केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयातील विशेष सचिव व वनमहासंचालक जितेंद्र कुमार प्रमुख पाहुणे होते. भारतीय वन्यजीव संस्थेने हाती घेतलेल्या सखोल संशोधनावर संचालक वीरेंद्र तिवारी यांनी भाष्य केले. वनांचे अतिरिक्त महासंचालक व वन्यजीव संरक्षण संचालक सुशील कुमार अवस्थी यांनी वन्यजीवांच्या संरक्षण, संवर्धनासाठी सामूहिक बांधिलकी व सहअस्तित्व स्वीकारण्याचे आवाहन केले. केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांना रागावणे म्हणजे आत्महत्येस प्रवृत्त करणे नव्हे

उच्च न्यायालयाकडून शिक्षकांवरील गुन्हे रद्द

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : विद्यार्थ्यांना शिस्त लागावी व त्यांचे उज्ज्वल भविष्य घडावे यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना रागावणे ही सामान्य बाब आहे, असे मत नोंदवत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने तीन शिक्षकांवरील गुन्हे रद्द करण्याचे आदेश दिले. न्या. विनय जोशी आणि न्या. वृषाली जोशी यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

अमरावती येथील जान्हवी राठोड ही स्कॉलर्स कॉन्व्हेंटमध्ये आठव्या इयत्तेत शिकत होती. १५ मार्च रोजी तिने एका इमारतीच्या आठव्या माळ्यावरून उडी मारून आत्महत्या केली. परीक्षेत 'चिटींग' करताना पकडल्यामुळे शिक्षकांनी रागावले म्हणून तिच्या पालकांनी अमरावतीच्या खोलापुरी गेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. आरोपानुसार, जान्हवीचा शाळेत संस्कृतचा पेपर होता. दरम्यान वर्गात उपस्थित शिक्षक स्नेहल निंभोरकर यांनी तिला 'चिटिंग' करताना पकडले. यानंतर संस्कृत विषयाच्या शिक्षिका सरोज दाणी यांनी जान्हवीला प्राचार्य साधना शेंडे यांच्या केबिनमध्ये नेले. जान्हवीला यावेळी तिच्या पालकांना याबाबत माहिती देण्याची धमकी दिली. तिला अडीच तास केबिनमध्येही बसवून ठेवण्यात आले. पालकांनी आरोप केला की शिक्षकांनी बालमानसिकता लक्षात न घेता हे कृत्य केले आणि त्यामुळे जान्हवीने आत्महत्या केली. यानंतर शिक्षकांवर दाखल झालेले गुन्हे रद्द करण्यासाठी त्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा रुग्णालयात

मुंबई : ज्येष्ठ उद्योगपती आणि टाटा सन्सचे माजी अध्यक्ष रतन टाटा (वय ८६) यांना सोमवारी पहाटे प्रकृती अस्वास्थ्यामुळे ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर हृदयरोगतज्ज्ञ डॉ. शाहरुख गोलवाला यांच्या निरीक्षणाखाली उपचार करण्यात येत आहेत.

टाटा यांनी स्वतः आपण नियमित तपासणीसाठी रुग्णालयात दाखल झाल्याचे निवदेन केले आहे.

रतन टाटा यांना रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्यांच्या प्रकृतीसंदर्भात अनेक अफवा समाजमाध्यमांमध्ये प्रसारित झाल्या. टाटा यांची प्रकृती गंभीर असल्याच्या अफवा पसरू लागल्या होत्या. मात्र वाढत्या वयोमानानुसार आवश्यक असलेल्या नियमित वैद्यकीय तपासण्यांसाठी रुग्णालयात दाखल झाल्याचे टाटा यांनी निवेदनाद्वारे जाहीर केले. चुकीच्या माहितीपासून प्रसारमाध्यमे आणि नागरिकांनी दूर राहावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

कार्यालय नगर परिषद, गडचिरोली

(बांधकाम विभाग)

// निविदा सुचना क्र.12/2024-25 // **जा.क्र.636/2024 दिनांक 07/10/2024**

नगर परिषद, गडचिरोली क्षेत्रात **साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना व नगरोत्थान योजना** अंतर्गत खालील दर्शविलेले बांधकाम अनुभवी कंत्राटदाराकडुन करावयाचे आहे. यासाठी ई-निविदाद्वारे टक्केवारी पध्दतीने महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग (P.W.D.) योग्य त्या श्रेणी मध्ये पंजिबध्द असलेल्या कंत्राटदाराकडून ई-निविदा द्वारे निविदा मागविण्यात येत आहे. या प्रमाणे त्रुटीसह किंवा अटीसह असलेली निविदा विचारात घेतली जाणार नाही. याबाबतची सविस्तर माहिती बांधकाम विभाग, अभियंता यांचे कडे कार्यालयीन वेळात पहावयास मिळेल. खालील कामाची निविदा प्रक्रीया संगणकावर ई-निविदा प्रक्रीयेद्वारे करण्यांत येईल. या निविदे संबंधी पुढील सर्व सुचना / शुध्दीपत्रके इत्यादी इंटरनेट वरील संकेत स्थळावर ऑन लाईन पध्दतीने प्रसिध्द करण्यात येईल. याबाबतची संपूर्ण माहिती **www.mahatenders.gov.in** या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

ई-निविदा पध्दती तपशील	
ऑनलाईन निविदा फार्म विक्री व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा सुरवातीचा दिनांक	दिनांक 08/10/2024 दुपारी 11.00 वाजेपासुन
ऑनलाईन निविदा सादर करण्याची शेवटची दिनांक	दिनांक 14/10/2024 ला दुपारी 03.00 वाजेपर्यंत
ऑनलाईन निविदा उघडणे दिनांक	दिनांक 15/10/2024 दुपारी 04.00 वाजता (शक्य झाल्यास)

स्वा/-
मुख्याधिकारी,
नगर परिषद, गडचिरोली

IDFC FIRST Bank

आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड, विबग्योर टॉवर्स, १०वा मजला, सी-६२, "जी" ब्लॉक, बीकेसी, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१.
ईमेल : annant.jain@idfcfirstbank.com

ई-लिलाव सूचना

स्विस चॅलेंज मेथडअंतर्गत थकीत ऋणांचे पुनर्गठन आणि इक्विटी भागभांडवल संपादन अंतर्भूत उड्डाणपूल व संबंधित संरचनांची देखभाल यासमवेत पाच मुंबई एन्ट्री पॉइंट्सच्या प्रतिभूतीकरण ठरावाकरिता प्रस्ताव मागविणारी ई-लिलाव सूचना

आम जनतेस याद्वारा सूचना देण्यात येते की, बँक्स व वित्तीय संघटनांचा संघ समाविष्ट आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (**"आयडीएफसी"**), इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर फायनान्स कंपनी लिमिटेड (**"आयआयएफसीएल"**), फिनिक्स एआरसी प्रायव्हेट लिमिटेड (**"फिनिक्स"**), ॲसेट्स केअर अँड रिकन्स्ट्रक्शन एन्टरप्राईज लिमिटेड (**"एसीआरई"**) व कॅनरा बँक (**"कॅनरा"**) (एकत्रितपणे **"सुरक्षित धनको"** किंवा **"धनको"** म्हणून संदर्भित), "आयडीएफसी"द्वारा कार्यरत, लीड बँक म्हणून (**"लीड बँक"**), ज्यांना (**"ऋणको"**) उड्डाणपूल व संबंधित संरचनांची देखभाल यासमवेत पाच मुंबई एन्ट्री पॉइंट्सच्या प्रतिभूतीकरणाकरिता पत सुविधा दिल्या आहेत, स्वारस्य असलेल्या पक्षकारांद्वारे (**"अँकर बोलीदार"**) ०१ जानेवारी, २०२२ रोजी आयोजिल्यानुसार, ऋणको आणि संरचना ऋणकोंच्या थकित देणीतील ५१% इक्विटी भागभांडवलाच्या संपादनाकरिता, *इतर गोष्टींसमवेत*, प्रस्तावाची (**"अँकर प्रस्ताव"**) स्वीकृती केली आहे.

वरील प्रस्तावाच्या पुढे तसेच धनकोंच्या वतीने आणि करिता कार्यरत, अग्रेसर बँकेने तिच्या दिनांकित ०७ जून २०१९ सर्क्युलरद्वारा रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाद्वारा निर्गमित केलेल्या, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (प्रुडेंशियल फ्रेमवर्क फॉर रिझल्युशन ऑफ स्ट्रेस्ड ॲसेट्स) डायरेक्शन्स, २०१९ च्या अनुसार सुरू केलेल्या ठरावाचा एक भाग म्हणून, अँकर प्रस्तावाच्या (**"बोली"**) उत्तम अटींच्या अनुसार स्वारस्याची अभिव्यक्ती / बोली सादर करण्याकरिता स्वारस्य असलेल्या पक्षकारांना निमंत्रण देत आहे. बोली प्रक्रियेचे आयोजन ई-लिलावामार्फत (**"बोली प्रक्रिया"**), अँकर प्रस्तावावर आधारित **"स्विस चॅलेंज मेथड"** द्वारा करण्यात येणार आहे. उक्त बोली प्रक्रियेअंतर्गत, भावी बोलीदारांनी उच्चत्तर रकमेत बोली सादर करणे आवश्यक आहे, ज्या अँकर प्रस्तावाच्या अटीत सादर केलेल्या आहेत. बोली एकदा सादर केल्यास आणि ई-लिलाव प्रक्रियेत निवड झाल्यास, अँकर बोलीदारास निवड झालेल्या बोलींच्या अटींशी जुळण्याकरिता प्रथम नकार देणाऱ्या हक्काची तरतूद करून देण्यात येणार आहे. जर कोणाचाही सहभाग झाला नसल्यास अँकर बोलीदारास यशस्वी बोलीदार म्हणून घोषित करण्यात येईल.

धनकोंचा केवळ "सर्व रोख" रचनेवर स्विस चॅलेंज मेथड हाताळण्याचा प्रस्ताव आहे आणि प्रदानाचे अन्य कोणतेही प्रारूप/ प्रणालीत अंतर्भूत प्रतिभूतींच्या निर्गमनाद्वारा किंवा अन्य मार्गे स्वीकार्य नाही. या अधिक, इक्विटी भाग भांडवलाचे संपादन "जसे आहे जेथे आहे","जसे आहे जे काही आहे", "जे काही आहे तेथे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय" या तत्त्वावर असणार आहे.

"बीओबी कॅपिटल मार्केट्स लिमिटेड"ची (**"बीओबीसीएपीएस"**) धनकोंची प्रक्रिया सल्लागार (**"प्रक्रिया सल्लागार"** किंवा **"पीए"**) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

"ईओआय" व इरठेच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख	११ ऑक्टोबर २०२४ रोजी सायं. ०५:०० वा. (भाप्रवे)
पाहणीची तारीख	१२ ऑक्टोबर २०२४ ते २७ ऑक्टोबर २०२४ (केवळ कामकाजाच्या दिवशी) स. ११:०० व सायं. ०५:०० वा. (भाप्रवे) दरम्यान
व्हीडीआरच्या, यथावकाश, प्रवेशाकरिता शेवटची तारीख	२७ ऑक्टोबर २०२४
अँकर बोलीदाराकडील हाती असलेला प्रस्ताव ("राखीव किंमत")	रु. १७०,००,००,०००/- (रुपये एकशे सत्तर कोटी फक्त)
इसारा रक्कम ठेव (इरठे)	रु. १७,००,००,०००/- (रुपये सतरा कोटी फक्त)
किमान मार्कअप	रु. ८,५०,००,०००/- (रुपये आठ कोटी पन्नास लाख फक्त) (म्हणजेच अँकर प्रस्तावाच्या ५%)
बोली सुरू होणारी किंमत	रु. १७८,५०,००,०००/- (रुपये एकशे अठ्ठ्याहत्तर कोटी पन्नास लाख फक्त) (चॅलेंजकरिता किमान बोली)
वृद्धी रक्कम (बोली पटीत)	रु. २,००,००,०००/- (रुपये दोन कोटी फक्त) व सदर पटीत
ई-लिलावाची तारीख व वेळ	२८ ऑक्टोबर २०२४ रोजी स. १०:०० (भाप्रवे) ते दु. ०१:०० (भाप्रवे)
व्यवहार अधिकारींचा तपशील	श्री. अन्नंत जैन व श्री. महेश बन्सल; ईमेल : annant.jain@idfcfirstbank.com
अन्य शर्ती व अटी	फॉरमॅट, ज्यामध्ये बोली प्रक्रियेवर आधारित स्विस चॅलेंजमध्ये सहभागी होण्याकरिता स्वारस्याची अभिव्यक्ती (**"ईओआय"**) आणि अन्य कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहेत (एकत्रित **"ईओआय कागदपत्रे"**), पीए'च्या वेबसाइटवर (www.bobcaps.in) उपलब्ध आहेत. उक्त पोर्टलवर "ईओआय कागदपत्रां"समवेत बोली प्रक्रिया कागदपत्रे (**"बीपीडी"** किंवा **"बोली प्रक्रिया कागदपत्रे"**) सुद्धा अपलोड केलेली आहेत. भावी बोलीदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांचे "ईओआय" आणि यथोचितरीत्या स्वाक्षरीकृत व स्टॅम्प्ड मूळ कागदपत्रे सादर करावीत : (ए) नॉन-डिस्क्लोजर अंडरटेकिंग (**"एनडीयू"**); (बी) वचनबद्धता व नुकसानभरपाई; आणि (सी) अन्य "ईओआय" कागदपत्रे. सर्व पूर्वोक्त पोर्टलवर उपलब्ध असलेल्या फॉरमॅट्सनुसार काटेकोरपणे किंवा इलेक्ट्रॉनिक प्रणालीत mipl@bobcaps.in यावरून ई-मेलद्वारा आणि/किंवा व्यवहार अधिकारींचे लक्ष वेधण्यास चिन्हांकित करून "बीओबी कॅपिटल मार्केट्स लिमिटेड, बी-१७०४, परिनी क्रेसेन्झो, "जी" ब्लॉक, बीकेसी, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१" येथे प्रत्यक्षरीत्या. "ईओआय कागदपत्रे" व इरठेच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख **११ ऑक्टोबर २०२४ रोजी सायं. ०५:०० वा. (भाप्रवे)** आहे. "ईओआय कागदपत्रां"चे सादरीकरण झाल्यानंतर, इसारा रक्कम ठेव (**"इरठे"**) आणि धनकोंच्या मंजूरीवर (जर आवश्यक भासल्यास), अल्पसूचीबद्ध पात्र बोलीदारांना व्हर्च्युअल डेटा रुमकडे (**"व्हीडीआर"**) प्रवेशास अनुमती देण्यात येईल. "व्हीडीआर" प्रवेशासमवेत, अल्पसूचीबद्ध बोलीदारांना यथावकाश आयोजनाकरिता "इन्फर्मेशन मेमोरंडम"कडेसुद्धा प्रवेशास अनुमती देण्यात येईल. बोलीदारास **२८ ऑक्टोबर २०२४** रोजी किंवा तत्पूर्वी बोली सादर करणे आवश्यक असणार आहे. बोली प्रक्रियेसंबंधित मुख्य माहिती, "टेंडर्स" टॅबअंतर्गत पीए'जच्या वेबसाइटवर उपलब्ध असणार आहे. बोली अर्जदारांनी, सर्व वेळेत, प्रक्रिया सल्लागाराच्या वेबसाइटवर अपलोड केल्यानुसार या संबंधित अद्ययावत अपडेट्स/ स्पष्टीकरणे/ सुधारणा / वेळेतील विस्तार, जर असल्यास, (समाविष्ट प्रक्रिया कागदपत्रे) या संबंधित माहितीबाबत स्वतःला सज्ज ठेवावे. प्रक्रिया सल्लागार किंवा धनको सदर फेरबदलाबाबत स्वतःला अपडेट ठेवण्याकरिता बोली अर्जदाराच्या कोणत्याही असमर्थतेस जबाबदार असणार नाहीत. धनको कोणतेही प्रवर्तनीय, विधि किंवा कर्ज अनावरण संबंधित अन्य कोणत्याही प्रकारच्या जोखमीस गृहीत धरले जाणार नाहीत. *अस्वीकरण :* *ही जाहिरात प्रक्रिया सल्लागार / धनकोच्या भागावरील कोणतीही बांधिलकी किंवा धनकोच्या वतीने किंवा त्यांच्याकडून असल्याचे सिद्ध होत नाही किंवा सिद्ध होत असल्याचे मानीव ठरणार नाही. प्रक्रिया सल्लागार / धनको कोणत्याही दायित्वाशिवाय आणि कोणतेही कारण न दाखवता बोली प्रक्रिया संपुष्टात आणण्याचा किंवा कोणत्याही शर्तीत बदल करण्याचा किंवा प्रक्रियेच्या कोणत्याही स्तरावर कोणताही / सर्व प्रस्ताव स्वीकारण्याचा किंवा नामंजूर करण्याचा, त्याकरिता कोणत्याही भागावर किंवा "ईओआय" व "बीपीडी"च्या शर्ती व अटींत फेरबदल करण्याचा / स्थगित करण्याचा / मागे घेण्याचा हक्क राखून ठेवीत आहेत.*
अधिक तपशिला-करिता संपर्क	BOBCAPS TRUST | INNOVATION | EXCELLENCE A wholly owned subsidiary of Bank of Baroda — १) श्री. सागर भद्रा - एव्हीपी : +९१७६६६४१२३९५; २) श्री. कुरिआकोसे पी. ॲलेक्स - एम : +९१९०७४०३७१८५; ३) श्री. रिषी शाह - एएम : +९१८२९१८९७८६२; ईमेल : milp@bobcaps.in

ई-लिलावाच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडची वेबसाइट : https://www.idfcfirstbank.com किंवा बीओबीसीएपीएस'ची वेबसाइट : https://www.bobcaps.in/tenders यावर तरतूद केलेली लिंक पाहावी.

स्थळ : मुंबई
दिनांक : ०७ ऑक्टोबर २०२४

स्वाक्षरी/-
श्री. अन्नंत जैन
व्यवहार अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड